**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### करिअर कट्टा : आर्थिक साक्षरता कार्यशाळा



लोकमत

**खेडमध्ये आर्थिक साक्षर कार्यशाळा**

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** वैयक्तिक वित्त व्यवस्थापनात उत्पन्न, बचत, खर्च, गुंतवणूक आणि सुरक्षा या दृष्टीने योग्य नियोजन आवश्यक असते. ते नेमके समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या साक्षर होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राच्या वतीने आयोजित करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत आर्थिक साक्षरता कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यशाळेत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ. संजय शिंदे यांनी वैयक्तिक वित्त व्यवस्थापन आणि बँक व्यवसायातील मूलतत्त्वे, डॉ. सागर थेऊरकर यांनी वित्तीय बाजार व संस्था, बाजारातील गुंतवणुकीची आर्थिक साधने, गुंतवणूक कौशल्य, डॉ. पायल ओसवाल यांनी कर्ज व्यवस्थापन, विमा व सुरक्षा, निवृत्ती नियोजन तर प्रा. मच्छिंद्र मुळक यांनी संभाव्य जोखीम व्यवस्थापन आणि अर्थक्षेत्रातील करिअर व रोजगाराच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. प्रास्ताविक करिअर कट्टा समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी केले. आभार डॉ. सागर थेऊरकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Oct 04, 2023
Powered by: erelego.com

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**

HRM